# प्रेसनोट

नाशिक,
दि. १८/०३/२०२६

## आलोसे पंकज विक्रम पाटील, तत्का. कार्यालयीन अधिक्षक, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, धुळे यांना लाचप्रकरणी मा. जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे यांनी ०३ वर्षे सक्त मजुरी व १०,०००/- रूपये द्रव्यदंडाची शिक्षा सुनावले बाबत

---

तक्रारदार यांनी ग्राम पंचायत विरदेल, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथील अंगणवाडीचे काम वेळेवर न केल्याने त्यांना उप अभियंता, शिंदखेडा बांधकाम उप विभाग यांनी कारणे दाखवा नोटीस दिली होती. त्यावेळी आलोसे पंकज विक्रम पाटील यांच्याकडे कार्यालयीन अधीक्षक पदाचा प्रभारी कार्यभार असतांना त्यांनी तक्रारदार यांचे विरूध्दची प्रशासकीय कार्यवाही टाळण्यासाठी व प्रकरण मिटविण्यासाठी तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रूपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दि.१६.०९.२०१६ रोजी स्वत: स्विकारल्याने त्यांचे विरूध्द धुळे शहर पो.स्टे. गुरनं. ३२८५/२०१६, भ्र.प्र. कायदा सन १९८८ चे कलम ७,१३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास श्री. पवन देसले, तत्का. पोलीस निरीक्षक, ला.प्र. विभाग, धुळे यांनी पुर्ण करून मा. जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे येथे दोषारोप पत्र दाखल केले होते.

सदर खटल्याची सुनावणी मा. श्री. एस. एम.तापकीरे, जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे यांच्या समोर होवुन मा. न्यायालयाने आज दि.१७.०१.२०२६ रोजी आलोसे पंकज विक्रम पाटील, तत्का. कार्यालयीन अधिक्षक, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, धुळे यांना सदर गुन्हयात दोषी ठरवुन भ्र.प्र.अधिनियम सन १९९८ चे कलम ७ अन्वये ०३ वर्षे सश्रम कारावास, १०,०००/- रूपये द्रव्य दंडाची शिक्षा व दंड न भरल्यास ०३ महिने साधा कारावास तसेच कलम १३(१)(ड) सह १३(२) अन्वये ०३ वर्षे सश्रम कारावास, १०,०००/- रूपये द्रव्य दंडाची शिक्षा व दंड न भरल्यास ०३ महिने साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

सदरच्या खटल्यात मा.श्री.भारत तांगडे, पोलीस अधिक्षक ला.प्र.वि, नाशिक परिक्षेत्र, नाशिक, मा.श्री. माधव रेड्डी,अपर पोलीस अधिक्षक ला.प्र.वि, नाशिक परिक्षेत्र, नाशिक व मा.श्री.सुनिल दोरगे,अपर पोलीस अधिक्षक ला.प्र.वि, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांचे मार्गदर्शनाखाली धुळे घटकाचे प्रभारी अधिकारी श्री. सचिन सांळुखे, पोलीस उपअधीक्षक,ला.प्र.वि,धुळे तसेच कोर्ट पैरवी अंमलदार पोकॉ/प्रविण पाटील व पोकॉ/सागर शिर्के ला.प्र.विभाग, धुळे यांनी कामकाज केले. सरकारपक्षातर्फे जिल्हा सरकारी अभियोक्ता श्री. देवेंद्र तवर व सरकारी अभियोक्ता श्री. अजय सानप यांनी न्यायालयात कामकाज पाहीले.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र तर्फे नागरीकांना आवाहन करण्यांत येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्रातील कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

खालील मोबाईल क्रमांक व दूरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी लॅंडलाईन ते लॅन्डलाईन व मोबाईल ते लॅन्डलाईन अशी टोल फ्री नंबर १०६४ ची सेवा सुरु करण्यांत आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीसंबंधी व करावयाच्या तक्रारीसंबंधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अनं | युनिटचे नांव | दूरध्वनी क्रमांक | टोल फ्री नंबर |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३-२५७५६२८, २५७८२३० | १०६४ |
| २ | अहमदनगर | ०२४१-२४२३६७७ | १०६४ |
| ३ | धुळे | ०२५६२-२३४०२० | १०६४ |
| ४ | नंदूरबार | ०२५६४-२३०००९ | १०६४ |
| ५ | जळगांव | ०२५७-२२३५४७७ | १०६४ |
| ६ | परिक्षेत्रीय कार्यालय | व्हॉट्सअप क्रमांक | ९५४५६५१०६४ |

( स्वप्निल राजपूत )
पोलीस निरीक्षक ( वाचक )
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र,नाशिक